## ८ त्यांची पण दिवाळी.

आज दिवाळीचा दिवस. सकाळपासून फोन, sms चा पाऊस पडत होता. मित्र , परिचयाचे लोक दिवाळी शुभेच्छा देण्यासाठी येत होते. असाच एक मित्र दिवाळी शुभेच्छा देण्यासाठी आला. फारसा मूडमध्ये दिसत नव्हता. चहा फराळ झाला. मी पण त्याच्याबरोबर बाहेर पडलो. अजूनही मित्राची कळी खुलली नव्हती.

मी सहज विचारले अरे आज तू मूडमध्ये दिसत नाहीस. काय समस्या आहे ? मग त्याने त्याच्या नाराजीचे कारण सांगितले व मला धक्काच बसला.

गाडीला गर्दी होती. रिक्शा मिळायला उशीर झाला. टिकीटाला लांबलचक रांग होती वगैरे.मी त्याला जुजबी समजावले. थोडाफार मूड सुधारला व तो घरी गेला.

काय मित्रांनो काय अंदाज ? मी त्याला काय समजावले असेल ? थांबा तुमची उत्सुकता मी फार ताणत नाही.

आज आपण सर्वजण त्रास झाला की चिडतो. पण त्या परिस्थितीचा फारसा गंभीरपणे विचार करत नाही. आज अगदी दिवाळीच्या दिवशीसुद्धा मला वाटते की पांढरपेशा माणूस ( ऑफीसात नोकरी करणारा ) सोडून बरेच जण कामावर होते.

आज देशाच्या सीमेवर आपले जवान तैनात आहेत म्हणून आपण सुखात घरात आहोत. पोलीसदल रस्त्यावर आहे. ट्रेनचे मोटरमन , गार्ड कामावर आहेत. बसचे वाहनचालक , कंडक्टरना सुद्धा सुटी नाही. डॉक्टर मंडळीही शस्त्रक्रिया करत आहेत. रिक्शा / टॅक्सी चे वाहनचालक सेवा देत आहेत.सकाळी दूधवाला, फुलवाला, कचरेवाला, इस्त्रीवाला घरी सेवा देऊन गेले. आज नळाला पाणी सुद्धा आले म्हणजे म्युन्सिपाल्टी चे पाणी विभागाचे लोक कामावर होते. अग्निशामक दलावर तर फारच मोठी जबाबदारी. रस्त्यावर कच-याचे ढीगही दिसले नाहीत. इमारत बांधकाम ही सुरू होते. ट्रकची वाहतूक पर्यायाने मालाची वाहतूक सुरू होती. हॉटेल सज्ज आहेत.

ही यादी कितीही लांब असेल. या सर्वांची पण दिवाळी होती. ह्यावेळी काहीजणांची लग्नानंतरची पहिली दिवाळी असेल. काहीजणांची मूले खूप लहान असतील. त्या लहान मुलांच्या मित्रांचे वडिल आज घरी असतील पण आपले बाबा आज कामावर म्हणून त्या छोटया जिवांचा कोंडमारा होत असेल. अशीच मनस्थिती ह्या लोकांच्या बायकांची, वडिलधा-या मंडळींची असेल. काही लोकांच्या मुलींची लग्ने नुकतीच झाली असतील. दिवाळसणाच्या तयारीला आपण घरी नाही म्हणून ह्या लोकांची मनःस्थितीही व्याकूळ झाली असेल.

हे सर्व सहन करून ही मंडळी आपल्याला अगदी दिवाळीच्या दिवशी सुद्धा सेवा देत आहेत. तुम्ही म्हणाल कि तो त्यांचा नोकरीचा भाग आहे. बरोबर. ब-याच गोष्टी आपल्या ही नोकरीचा भाग असतात व आपण किती मोठया मनाने त्या स्वीकारतो ? कित्येक लोकांचे पोट दिवसभराच्या कामाच्या वेतनावर अवलंबून असते म्हणून त्यांना काम करावेच लागते. ही वस्तुस्थिती नजरेआड करून आपल्याला जरासा त्रास झाला तर आपल्याला सोसवत नाही. खरेतर ही सर्व मंडळीच ख-याअर्थाने कर्मयोगी आहेत. सेवाकर्मी आहेत.

ही शिकवण आपण जर आपल्यावरील जबाबदारी पार पाडताना लक्षात ठेवली तरच ह्या सर्व सेवाकर्मींची सेवा कामी आली असे म्हणता येईल. नाहीतर आपली चिडचिड आहेच. काय ?

पटतोय का माझा विचार ?